# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४४० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२४ / ०७ / २०१६.

**१)पुलीयाचा बांधकामासाठी ठेवलेल्या सामानाची चोरी.:—**

दिनांक २२ / ०७ / २०१६ ते २३ / ०७ / २०१६ चे ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी सैयद अली युनुस अली वय ३८ वर्ष, रा. सिहोरा हा ठेकेदार अखील रिजवी यांचे ठेकेदारीचे कामावर सुपरवायझर म्हणुन काम पाहतो. पुलीयाच्या बांधकामाकरीता ठेवलेल्या लोखंडी सलाखी १० एमएम चे पाच बंडल, १२ एमएम चे ०४ बंडल व एक पाण्याची मोटारपंप असा एकुन कि. १,४६,५०० / —रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहे.

**२) शेतातील रोवणीने ट्रॅक्टरने नुकसान केल्यावरून गुन्हा नोंद. :—**

दिनांक २१ / ०७ / २०१६ रोजी १२.०० वा. ते १४.०० वा. दर. फिर्यादी संदीप ईश्वर बोंन्द्रे वय ३० वर्ष रा. हणुमान वार्ड वरठी फिर्यादीचे मालकीचे गट क्र. ८९ / ०२ मध्ये २ एकर शेतीत रोवणा लावला होता तो रोवणा अरोपीतांनी संगनमत करून ट्रॅक्टरने मोडला असुन फिर्यादी यांचे १,२०,००० / —रू. चे नुकसान केल्याने फिर्यादीचे यांच्या लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४४७,४२७,३४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खोकले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३)अपघातात इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २० / ०७ / ०१६ रोजी १६.३० वा. दर. यातील मृतकने आपले ताब्यातील मो. सा. ही भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत होवुन त्यास सा.रू. भंडारा येथ उपचाराकरीता भरती केले असता उपचारा दरम्यान दि. २० / ०७ / २०१६ चे १९.१० मरन पावल्याने पो. स्टे. भंडारा मर्ग क्र. ०० / १६ क. १७४ जाफौचे केस पेपर वरून पो.स्टे. मर्ग क्र. ४८ / १६ क. १७४ जाफौ चे चौकशी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वावनखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–**

दिनांक २४/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. करडी, साकोली, पवनी व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १६ लिटर हातभट्टी दारू कि. ४,०००/रु. व ८१७ लिटर ३८० मिली देशी दारु.+ एक टाटा गाडी कि. ६,१८,०५०/–रु. तसेच जुगारातुन कि. ९७/– रु. असा एकुण कि. ६,२२,१४७ /–रू. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करिता.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.